# राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी विभाग, पुणे.

डॉ. (श्रीमती) मा.अ.तळवलकर
एम.ए.,पी.एच.डी.
उपसंचालक
तथा
उपमुख्य निबंधक जन्म- मृत्यु
महाराष्ट्र राज्य,

दुरध्वनी क्र. : ६१२७२९२ (वै) ६०५५५३०
फॅक्स कमांक : ०२० - ६१२७२९२
तार : जन्ममृत्यु
निकनेट : jdhivs@man.nic.in
ई-मेल : sbhivs@pn3.vsnl.net.in
डॉ. नायडू हॉस्पीटल कंपाऊंड, माहिती संस्करण केंद्र आवार, पुणे - ४११ ००१.


जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८३/दत्तक बाजन्मनोंद/ 92289-380 /२००१. दिनांक : ५/१०/२००१.

महत्वाचे

प्रति,

जिल्हा आरोग्य अधिकारी
तथा जिल्हा निबंधक जन्म-मृत्यु,
जिल्हा परिषद,...................... (सर्व)

विषय :- दत्तक घेतलेल्या बालकांच्या जन्माची नोंद करणेबाबत.

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्र.आमाजीआ/कक्ष-८३/दत्तक पुत्र /१०७३३-८०८/९९, दिनांक २ ऑगस्ट १९९९.

उपरोक्त संदर्भिय पत्रासोबत मा. महानिबंधक, भारत सरकार यांचे दिनांक १४ जुलै, १९९९ च्या इंग्रजी पत्राची प्रत सोबत जोडून आपणांस त्या पत्रातील मसुद्यानुसार कार्यवाही करण्याचे सूचविले होते. या पत्राचे मराठी भाषांन्तर प्राप्त करुन घेऊन यासोबत आपणाकडे पाठविण्यात येत आहे. जिल्हा निबंधक जन्म-मृत्यु या नात्याने आपण स्वतः व आपले सांख्यिकी अधिकारी तसेच सांख्यिकी अन्वेषक (जिआ) यांनी सखोल अभ्यास करुन आपल्या जिल्हयातील ग्रामीण व शहरी जन्म-मृत्यु निबंधकांच्या शंका दूर करणे गरजेचे आहे. गट विकास अधिकारी, पंचायत समिती तसेच मुख्याधिकारी नगरपरिषद यांचे बैठकीत या विषयावर चर्चा घडवून आणून त्याच्या प्रश्नाना समर्पक उत्तर देऊन दत्तक पुत्राची नोंद दिलेल्या सूचनानुसार होत आहे कां? याची खात्री करण्यास सूचवावे.

हे पत्र प्राप्त होताच संबंधीतांना भारत सरकारच्या मराठी पत्राची प्रत त्वरीत पाठविण्याचे सुचवावे व तसे या कार्यालयास कळवावे.

मा.अ.तळवलकर

उपसंचालक आरोग्य सेवा
(आमाजीआ) तथा
उपमुख्य निबंधक जन्म-मृत्यु,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत - कार्यकारी आरोग्य अधिकारी,
महानगरपालिका मुंबई व
आरोग्य प्रमुख महानगरपालिका,...................... (सर्व)

यांना देवून विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांचे कार्यकक्षेतील सर्व उपनिबंधकांना याबाबत माहिती देवून सूचनांची अंमलबजावणी अपेक्षेप्रमाणे होत आहे कां? याची खात्री वेळोवेळी करत जावे.

प्रत सादर -

मा. महासंचालक आरोग्य सेवा
तथा मुख्य निबंधक जन्म-मृत्यु,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.